**व्ही. चारुलथा आणि इतर.**

वि.

**एस. गुणलान चेअरमन रेल्वे भरती मंडळ, मद्रास आणि इतर**

दि- **०४ एप्रिल, १९९५**

(**मा. न्यायमूर्ती आर. एम. साहा आणि मा. न्यायमूर्ती एस. बी. मुजुमदार**)

सेवा अधिनियम - अवमान याचिका - रेल्वे - बिगर तांत्रिक वर्गाच्या पदांसाठी निवड - निकाल जाहीर – दुसरी परीक्षा घेण्याचा निर्णय – रद्द - अपिल - सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश २ आठवडयात निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक करावी - पूर्तता नाही - ८ वर्षे उलटली - न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करता न येण्याचा खुलासा न पटणारा - मार्च १९९५ पर्यंत उमेदवारांची नेमणूक करण्याची अंगावर घेतलेली जबाबदारी न पाळणे - बारा आठवडयात सर्व उर्वरित उमेदवारांची नेमणूक करावीच असे निर्देश.

न्यायालयीन अवमान अधियिम १९७१ – नोकरी प्रकरण - रेल्वे - बिगर तांत्रिक वर्गाच्या पदांसाठी निवड - निकाल जाहीर – दुसरी परीक्षा घेण्याचा निर्णय – रद्द - अपिल - सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश २ आठवडयात निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक करावी - पूर्तता नाही - ८ वर्षे उलटली - न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करता न येण्याचा खुलासा न पटणारा - मार्च १९९५ पर्यंत उमेदवारांची नेमणूक करण्याची अंगावर घेतलेली जबाबदारी न पाळणे - बारा आठवडयात सर्व उर्वरित उमेदवारांची नेमणूक करावीच असे निर्देश.

१९८७ साली रेल्वे भरती मंडळ, मद्रास यांनी भारतीय रेल्वेत, 'बिगर-तांत्रिक' वर्गाच्या उदा. लिपीक तिकीट तपासणीस, प्रशिक्षित लिपीक इत्यादी जवळ जवळ ५०० पदांकरीता जाहिरात दिली. ता. १५ नोव्हेंबर, १९८७ ला, त्याकरता ३९९७ परीक्षा केंद्रात लेखी परीक्षाही झाल्या. नोकरीच्या नोटीसीला प्रतिसाद देऊन फार मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी अर्ज केले. दुस-याच दिवशी एका स्थानिक वर्तमान पत्रात या आशयाची बातमी प्रकाशित झाली की, परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली होती. तथापि, परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि मुलाखती घेण्यात आल्या. ज्यांना लेखी परीक्षेत भरपूर गुण मिळाले होते त्यांना मुलाखतीत मात्र अगदी कमी गुण मिळाले म्हणून अधिका-यांनी दुस-यांदा लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार एप्रिल १९८९ ला पत्रे पाठवण्यात आली. त्याच्या दुस-याच दिवशी अन्याय झालेल्या काही उमेदवारांनी केंद्रीय प्रशासन न्यायाधिकरणाकडे तर, काहींनी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायाधिकरणाने असे धरले की, रेल्वे भरती बोर्डास दुसरी परीक्षा घेण्याचा अधिकार आहे.

'न्यायाधिकरण स्थापन झाल्यानंतर, उच्च न्यायालयास अधिकार क्षेत्र रहात नाही' या आशयाची हरकत घेण्यात आली. तथापि, ती फेटाळण्यात आली. त्या आदेशाविरुध्द रेल्वेने विशेष अनुमती याचिका दाखल केली. या न्यायालयाकडून त्यांना कोणताही अंतरीम आदेश देण्यात आला नाही. उच्च न्यायालयाने दुस-यांदा परीक्षा घेण्याचा आदेश रद्द केला. त्याविरुध्द खंडपिठासमोर केलेले अपिल देखील फेटाळण्यात आले. त्यास सर्वोच्च न्यायालयासमोर आव्हान देण्यात आले आहे.

ता. १८/०९/१९९२ ला, या न्यायालयानी अपिलार्थीला असे निर्देश दिले होते की, त्यांनी त्या आदेशाच्या तारखेपासून २ आठवड्यात गुणवत्तेवर सध्याच्या रिक्त पदावर निवडलेल्या उमेदवारांची नियुक्ती करावी. तथापि, भरीव काहीच झाले

नाही. ता. ३०/०४/१९९३ ला, अवमान अर्ज दाखल करण्यात आला. आदेश झाल्यापासून जवळ जवळ दोन वर्षांनी या न्यायालयाच्या असे लक्षात आणून देण्यात आले की, नेमणूकीशी अपीलार्थीचा काहीही संबंध नसून, ती जबाबदारी नेमणूक अधिका-यांची आहे. ता. २७/०९/१९९३ ला, या न्यायालयाने नेमणूक अधिका-यांना नोटीस काढली. तेव्हा असे आश्वासन देण्यात आले की, निवड झालेल्या सर्व उमेदवारांना गुणवत्ता यादीनुसार टप्प्या-टप्प्याने मार्च, १९९५ पर्यंत नेमणूका मिळतील. ता. ०१/०९/१९९४ ला, या न्यायालयाने रेल्वेला याचा खुलासा मागितला की, या न्यायालयाच्या आदेशाची अद्याप पूर्तता का झाली नाही? तेव्हा अशी विनंती करण्यात आली की पूर्तता करण्याकरता आणखी एक वर्षाचा अवधी वाढवावा. आदेशाची पूर्तता वेळेत न करण्याचे कारण असे देण्यात आले की, कामात संगणकाचा वापर सुरु झाल्याने अनेक पदे कमी झाली असून, पारंपारिक कामे बंद झाली आहेत. दरम्यानच्या काळात उच्च न्यायालयाने, रिट याचिकेचा निर्णय दिला. त्यानुसार, उमेदवाराच्या पुन्हा नव्याने परीक्षा न घेण्याचा निर्णय अंतिम झाला. रेल्वे भरती मंडळास १९८९ आणि १९९० साली ९८८ उमेदवारांची नवी दोन 'पॅनल्स' मिळाली. त्यामुळे रिक्त पदांची उपलब्धता पूर्णतः बदलली आणि निवड झालेल्या उमेदवारांच्या नेमणूका करणे अशक्य झाले. त्यामुळे, जागा जेव्हा आणि जश्या रिक्त होतील, तसतश्या नेमणूका करण्यावाचून पर्यायच राहिला नाही. ज्या उमेदवारांची निवड दक्षिण रेल्वेसाठी झाली होती, त्यांनी रेल्वेच्या अन्य विभागात नोकरी धरण्यास नापसंती दर्शवली.

प्रकरण निकाली काढताना या न्यायालयानी असे धरले की,

**१.१** भारतीय रेल्वेत बिगर तांत्रिक वर्गाकरीता निवड करण्याची जाहिरात रेल्वे मंडळाने देऊन ८ वर्षे होऊन गेली. १९८८ साली त्या परीक्षेचा निकाल देखील झाला. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी न करण्यासाठी देण्यात आलेला

खुलासा समाधानकारक नाही. मार्च, १९९५ पर्यंत उमेदवारांची नेमणूक करण्याची अंगीकारलेली जबाबदारी अधिका-यांनी पार पाडली नाही. १९८७ साली ७७५ उमेदवार निवडण्यात आले. नवी परीक्षा घेण्याचा निर्णय १९८९ चा आहे. उमेदवारांनी लगेचच न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयात दाद मागितली. त्यामुळे, रेल्वेला हे चांगले माहित होते की, या विषयीचा वाद न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, त्यांनी १९८९ किंवा १९९० साली ताजी निवड करावयास नको होती.(१४८-क-ड)

१९८९ आणि १९९० च्या २ पॅनल्स मधील रिक्त पदे केवळ १९८७ सालानंतर निर्माण झाली. जाहिरातीत तसेच, उच्च न्यायालयासमोर असे कोठेही भाष्य नाही की, १९८७ च्या रिक्त पदांकरताच १९८९ आणि १९९० साली परत जाहिरात दिली आहे. त्यामुळे हे समजू शकत नाही की, १९८७ साली अस्तित्वात असलेल्या रिक्त पदांकरता १९८९ आणि १९९० मध्ये पुन्हा जाहिरात कशी दिली जाऊ शकते? हे देखील समजू शकत नाही की, १९८७ साली अस्तित्वात असलेली पदे १९८९, १९९० आणि १९९२ मध्ये कशी नाहीशी झाली? १९९१ सालीच विद्वान एकमेव न्यायमूर्ती यांनी परत दुस-या परीक्षा घेण्याचा आदेश रद्द केला होता. कोणत्याही न्यायालयाकडून स्थगिती आदेश नसताना रेल्वे आपणहून या व्यक्तीच्या नेमणूका न करण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. तसेच, ज्या उमेदवारांची निवड १९८७ ला झाली आहे, त्यांना नेमणूकीपासून वंचित ठेवू शकत नाहीत. पदांची संख्या घटली वगैरे कथन फारश्या गांभीर्याने आणि जबाबदारीने केलेले दिसत नाही. उच्च न्यायालयाने १९९१ साली याचिकेचा निर्णय दिला तेव्हा, तेथे तसे सांगण्यात आले नव्हते. तसेच, विशेष अनुमती याचिकेतही तसे काही नव्हते. मुख्य वैयक्तिक अधिकारी यांच्या शपथपत्रानुसार १९८७ ते १९९३-१९९४ या काळात पदांची संख्या घटली. याचिकांचे निर्णय होण्याआधी ती अडचण नव्हती. जर तसे खरोखरच

असते तर, १९८९ आणि १९९० मध्ये निवड प्रक्रिया कशी झाली? अपिलार्थीच्या या खुलाश्यावर देखील आम्ही समाधानी नाही की, ज्यांची निवड झाली त्यांना दक्षिण रेल्वेत येण्याचा प्रस्ताव दिला होता. परंतु, त्यांनी तो नाकारला. अपिलार्थी यांचे सगळे वागणे हे न्याय्यवर्तनाशी विसंगत आहे.

**१.२** रेल्वेनी उर्वरीत उमेदवारांची नेमणूक १२ आठवड्यात करावीच.(१४९ क)

**दिवाणी अपिलेट अधिकारक्षेत्र आय.ए.नं.१६०-२३८ / १९९३** वगैरे.
**दिवाणी अपिल क्र. २५७७-२६१६ आणि ३२-७० / १९९१** वगैरे.
**मद्रास उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ५३३ / १९९१** मधील ता. **१५/०४/१९९१** च्या निकाल व आदेशावर.

व्ही. आर. रेड्डी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल, अरविंद के. शर्मा, बी. कृष्णप्रसाद, हेमंत शर्मा, व्ही. बालचंद्रण, व्ही. रामसुब्रमण्यम, के. राजेंद्र चौधरी, राकेश शर्मा आणि अंबरिष कुमार पक्षकारांच्या वतीने हजर

**न्यायालयाकडून खालील आदेश पारित झाला.**

न्यायमूर्ती मा. आर. एम. साहा - सदरचे अर्ज हे अत्यंत दुर्दैवी परिस्थितीतून उद्भवले आहेत. (संबंधीतावर) कसलीही कठोर कारवाई करण्याचे या न्यायालयाने (आज पावेतो) टाळले तथापि, त्याचे योग्यप्रकारे चिज झालेले दिसत नाही. 'मार्च, १९९५ पर्यंत, मा. उच्च न्यायालयाच्या आणि या न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करु' असे आश्वासन विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी देऊन देखील, आता तब्बल २ वर्षे होऊन गेली आहेत. त्यानंतर त्यासाठी निर्धारित वेळ आखण्याचा पाठपुरावा करण्यात आला. तथापि, खेदाने म्हणावेसे वाटते की,

केवळ वेळ मागणे आणि सबबी सांगणे या पलीकडे काहीही न झाल्याने, आता या न्यायालयाला हा आदेश करण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही.

वरील प्रतिकूल निरीक्षण आम्ही का नोंदवले आहे? हे समजण्याकरता प्रकरणाची थोडीशी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. १९८७ साली रेल्वे भरती मंडळ, मद्रास यांनी भारतीय रेल्वेत, 'बिगर-तांत्रिक' वर्गाच्या उदा. लिपीक तिकीट तपासणीस, प्रशिक्षीत लिपीक इत्यादी जवळ जवळ ५०० पदांकरीता जाहिरात दिली. ता. १५ नोव्हेंबर, १९८७ ला, त्याकरता ३९९७ परीक्षा केंद्रात लेखी परीक्षाही झाल्या. नोकरीच्या नोटीसीला प्रतिसाद देऊन फार मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी अर्ज केले. दुस-याच दिवशी एका स्थानिक वर्तमान पत्रात या आशयाची बातमी प्रकाशित झाली की, परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली होती. तथापि, त्यावर काहीही घडले नाही. ता. ०७/०९/१९८८ ला परीक्षेचा निकाल जाहीर झाला. ता. १०/१०/१९८८ ला मुलाखती घेण्यात आल्या. ज्यांना लेखी परीक्षेत भरपूर गुण मिळाले होते त्यांना मुलाखतीत मात्र अगदी कमी गुण मिळाले म्हणून अधिका-यांनी दुस-यांदा लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार एप्रिल १९८९ ला पत्रे पाठवण्यात आली. त्याच्या दुस-याच दिवशी अन्याय झालेल्या काही उमेदवारांनी केंद्रीय प्रशासन न्यायाधिकरणाकडे तर, काहींनी उच्च न्यायालयात धाव घेतली. ता. १३/०६/१९८९ ला, केंद्रीय प्रशासन न्यायाधिकरणानी असा निर्णय दिला की, जे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र आहेत त्यांची रेल्वे मंडळास दुस-यांदा लेखी परीक्षा घेण्याचा अधिकार आहे. पहिल्या लेखी परीक्षेत मिळालेले गुण आणि दुस-या लेखी परीक्षेत मिळालेले गुण या दोन्हीची बेरीज करुन, त्याची सरासरी काढण्यात येईल आणि निवड करते वेळी ते गुण अंतिम समजले जातील. उमेदवारांच्या दुस-या तुकडीची सुनावणी उच्च न्यायालयाने ऐकली. अपिलार्थींचे कथन असे होते की, न्यायाधिकरण स्थापन झाल्यानंतर, उच्च न्यायालयास अधिकार क्षेत्र रहात नाही.

तथापि, यास नकार देण्यात आला. खंडपिठासमोर केलेले अपिल देखील फेटाळण्यात आले. त्या आदेशाविरुध्द रेल्वे या न्यायालयाकडे दाद मागावयास आली आणि त्यांनी त्याकरता अनुमती घेतली.(सी.ए.क्र.३२-७०/१९९१) या न्यायालयाच्या एकमेव न्यायमूर्तींनी अंतरिम आदेश न दिल्याने, मद्रास उच्च न्यायालयाने रिट याचिका ऐकून दुस-यांदा परीक्षा घेण्याचा ता. १५/०४/१९८९ चा रेल्वे अधिका-यांचा निर्णय रद्द ठरवला. त्यांना असा देखील निर्देश देण्यात आला की, ता.३१/०३/१९९१ च्या आत यशस्वी उमेदवारांची यादी जाहीर करावी. सदरचा निकाल ता. १५/०४/१९९१ ला खंडपिठाने कायम केला. त्या निकालाविरुध्द रेल्वेने या न्यायालयाकडे दाद मागितली आणि त्यांना ता. ३०/०६/१९९१ ला अनुमती देखील देण्यात आली. त्यांना त्यावेळी असे निर्देश देण्यात आले की, या अपिलांची सुनावणी, पूर्वीच्या अपिलांच्या बरोबर होईल. सन १९९१ मध्ये अनेक तारखांना दोन्ही अपिलांचे संच यादीवर आले. परंतु, त्यांचे निर्णय होऊ शकले नाहीत.

म्हणून, ता. १८/०९/१९९२ ला या न्यायालयानी अपिलार्थीस असे निर्देश दिले की, त्यांनी सध्याच्या रिकाम्या पदांवर गुणवत्तेनुसार निवडलेल्या उमेदवारांची नेमणूक आदेशाच्या तारखेपासून २ आठवड्यात करावी. परंतु, त्यानंतर भरीव असे काहीच घडले नाही. परिणामी, 'अवमान-याचिका' दाखल करण्यात आली. ते अर्ज आणि अपिले ता. ३०/०४/१९९३ ला निकाली काढण्यात आले. तो आदेश खाली नमूद केला आहे.

अपिलार्थींच्या वतीने विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आणि उत्तरवादींच्या वकीलांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांनी उमेदवारांची निवड केली असून, निवड केलेल्या ७७५ जणांची यादी १. मुख्य वैयक्तिक अधिकारी, दक्षिण रेल्वे, मद्रास, २. आर्थिक सल्लागार आणि मुख्य हिशेब अधिकारी आणि ३.

मुख्य वैयक्तिक अधिकारी, पेरमबुल, मद्रास या तिघांना पाठवली आहे. निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक करणेबाबत अपिलार्थींना आजमितीला काहीही करावयाचे नाही. निवड झालेल्या उमेदवाराच्या सूचीत यादीनुसार, रिक्त पदी त्यांची गुणवत्तेनुसार भरती करण्याचे काम नेमणूक अधिका-यांचे आहे.

उच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यापासून ते दिर्घ काळ प्रलंबित असल्याने, आम्हास आशा आहे आणि आमचा विश्वास आहे की, ज्यांना निवड झालेल्या उमेदवारांची वेगळी यादी पाठवली आहे ते नेमणूक अधिकारी उमेदवारांची नेमणूक करण्याकरता जलद आणि सुयोग्य पावले उचलतील. गरज पडल्यास, त्यासाठी अर्ज दाखल तारखेचे वेळी उमेदवारांचे वय विचारात घेवून वयाची अट शिथील करतील. ता. १८/०९/१९९२ ला करण्यात आलेला अंतरिम आदेशात त्या हद्दीपर्यंत सुधारणा करण्यात आली.

विद्वान सॉलिसिटर जनरल यांनी असे विधान केले की, अपिलार्थी यांना नेमणूकांबाबत आता काहीही करावयाचे नसल्याने आणि निवड यादी या आधीच पुढे पाठवली असल्याने या विशिष्ट परिस्थितीत सदरचे अपिल व्यवहारिक दृष्टया आता निकामी झाले आहे. सबब ते फेटाळण्यात आले आहे.

कार्यालयाला असे आदेश देण्यात आले आहेत की, वरील आदेशाची प्रत नेमणूक अधिकारी यांना पाठवावी.

अपिले आम्ही फेटाळली असल्याने अवमान याचिकेबाबत देखील कारवाई करण्याचे कारण उरलेले नाही. म्हणून, अवमान याचिका देखील निकाली काढल्या आहेत.

अश्या प्रकारे आदेश पारित झाल्यानंतर जवळ जवळ दोन वर्षांनी या न्यायालयाच्या हे लक्षात आणून देण्यात आले की, नेमणूकीबाबत अपिलार्थी यांना काहीही करावयाचे नसून, ती जबाबदारी नेमणूक अधिकारी यांची आहे. सबब, ता. २७/०९/१९८७ ला, या न्यायालयाने १. मुख्य वैयक्तिक अधिकारी, दक्षिण रेल्वे, मद्रास, २. आर्थिक सल्लागार आणि मुख्य हिशेब अधिकारी आणि ३. मुख्य वैयक्तिक अधिकारी, पेरमबुल, मद्रास वरील तिघांना नोटीसा काढल्या. वरील अधिका-यांना नोटीसा काढल्यानंतरच दक्षिण रेल्वे, मद्रासच्या उप-मुख्य वैयक्तिक अधिकारी यांनी प्रतिशपथपत्र दाखल केले. उभयपक्षांची बाजू ऐकून या न्यायालययाने ता. ०८/१२/१९९३ ला, खालील आदेश केला.

विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी नेमणूक अधिकारी यांच्या वतीने आमच्यासमोर असे आश्वासन दिले की, ता. १५/०४/१९८७ च्या नोटीस क्र. १/८७ नुसार, ७७५ रिक्त पदी अगोदरच तयार असलेल्या गुणवत्ता यादीनुसार सर्व उमेदवारांच्या नेमणूका होतील. ता. १०/०३/१९९४ ला, यापैकी काही उमेदवारांना पहिल्या टप्प्यात सामावून घेतले जाईल. त्यापैकी १०० जणांना कारागिराचे पद मिळेल आणि बाकीच्यांना व्यापारी लिपीक, तिकीट तपासणीस, प्रशिक्षीत लिपीक वगैरे पदांवर मार्च १९९५ च्या अखेरीपर्यंत भारतीय रेल्वेत सामावले जाईल. शिवाय, या उमेदवारांनी स्वीकारण्याची इच्छा दर्शवली तर, कारागिराच्या उरलेल्या १०० जागा देखील प्राधान्य क्रमाने त्यांनाच देऊ. अन्यथा, ज्या पदासाठी त्यांची निवड झालेली आहे, त्या पदावरच त्यांची नेमणूक होईल. उत्तरवादीने अशी देखील हमी दिली की, जो पर्यंत निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक होत नाही. तोपर्यंत, अनुकंपा तत्वावरील नेमणूका वगळून अन्य कोणत्याही नेमणूका होणार नाहीत.

वरीलप्रमाणे नेमणूका न चुकता होतील असे आश्वासन देण्यात आले. नेमणूकांची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांची वयाची अट शिथील करण्यात येईल. ता. ११/०३/१९९४ ला, सदरचे प्रकरण यादीत घेण्यात आले.

ज्यावेळी, हे अर्ज सुनावणीला आले तेव्हा, अपिलार्थी तर्फे असे सांगण्यात आले की, नेमणूकांची १९७ पत्रे धाडण्यात आली आहेत. ता. ०१/०९/१९९४ ला, न्यायालयानी रेल्वेस खुलासा मागितला की, या न्यायालयाच्या आदेशाची अद्याप पूर्तता का करण्यात आली नाही?. ता. १५/०९/१९९४ ला, एक जादा शपथपत्र दाखल करण्यात आले. त्यात असे सांगण्यात आले की, दक्षिण रेल्वे आणि 'इंटेग्रल कोच फॅक्टरी'त बिगर तांत्रिक पदाकरीता १०५ अराखीव, ७० अनुसूचीत जातीच्या आणि ४ अनुसूचित जमातीच्या नेमणूकांचा प्रस्ताव देण्यात आला. ता. ०८/०३/१९९४ ला, दक्षिण रेल्वेत कुशल कारागीर पदाकरता होकार दर्शवण्याकरता ७० अराखीव, २६ अनुसूचीत जाती आणि ४ अनुसूचीत जमातीच्या पदांसाठी विचारण्यात आले. त्यापैकी, ४६ जणांनी त्यांची संमती दिली. उमेदवारांची संख्या भरपूर असल्याने, भारतीय रेल्वे आणि रेल्वे महामंडळ यांना रिक्त पदे शोधून काढण्याबाबत सांगण्यात आले. मध्य रेल्वेत त्यांना सेवेत घेऊ असेही ठरले. म्हणून, ज्यांनी कुशल कारागीर पद स्वीकारण्यास नकार दिला. त्यातील ४० अराखीव, १२ अनुसूचीत जाती आणि २ अनुसूचीत जमातीचे उमेदवार यांच्या समोर असा प्रस्ताव ठेवण्यात आला की, त्यांनी मध्य रेल्वेत, 'तिकीट-तपासणीस' पद स्वीकारावे. या ५४ उमेदवारांव्यतिरिक्त, आणखी ५३ अराखीव, ४० अनुसूचीत जाती आणि १८ अनुसूचीत जमातीच्या उमेदवारांना असा प्रस्ताव देण्यात आला की, त्यांनी देखील मध्य रेल्वेत नोकरी धरावी. यापैकी अनुसूचीत जातीच्या १७ जणांनी आणि अनुसूचीत जमातीच्या ४ जणांनी तसेच, ४१ अराखीव उमेदवारांनी तसे करण्याची तयारी दर्शवली. शपथपत्रात पुढे असे

नमूद करण्यात आले आहे की, ज्यांनी प्रत्यक्षात मध्य रेल्वेत नोकरी पत्करली त्यांची संख्या निश्चीत करुन, बाकीची कमतरता गुणवत्तेनुसार इच्छूक उमेदवारांच्या नेमणूका करुन, भरुन काढण्यात येईल. मध्य रेल्वेत नोकरी पत्करावयास तयार असलेले वजा करुन देखील, ३१९ उमेदवार शिल्लक रहातात. मार्च १९९५ पर्यंत त्यांच्या नेमणूका होतील. म्हणून अशी विनंती करण्यात आली की, आदेशाचे पालन करण्याकरता आणखी एक वर्षाची मुदतवाढ मिळावी.

विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी सुनावणीच्या मागच्या दिवशी म्हणजेच ता.२७/०३/१९९५ ला, दाखल केलेला तक्ता पहाता असे आढळते की, दक्षिण रेल्वे आणि इंटेग्रिल कोच फॅक्टरी, मद्रास येथे १४७ उमेदवारांच्या बिगर तांत्रिक वर्गात तर, दक्षिण रेल्वेत कुशल कारागीर या पदावर ३८ जणांच्या नेमणूका झालेल्या आहेत. नोव्हेंबर, १९९३ ला, मुख्य वैयक्तिक अधिकारी यांनी सादर केलेल्या शपथपत्रात न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्याचे कारण दुहेरी आहे. त्यापैकी एक म्हणजे कामाचे संगणीकरण झाल्याने, अनेक कामे नाहीशी होऊन, ती पदे नष्ट झाली. दुसरे कारण असे की, उच्च न्यायालयातील रिट याचिकांचे निर्णय होईपर्यंत नव्या परीक्षा घेऊ नयेत, हा आदेश १९९२ साली अंतिम झाला. तोपर्यंत, अपिलार्थी / रेल्वे भरती मंडळ यांच्याकडे ता. ०८/०८/१९९० आणि ता. २८/०३/१९९१ ला, ९९८ उमेदवारांचे दोन पॅनल्स प्राप्त झाली. त्यामुळे, रिक्त पदांची उपलब्धदता पूर्णतः बदलली. दरम्यान, २३/०९/१९९२ ला, विवाद्य पॅनल मिळून, रिक्त पदांची संख्या इतकी घटली की, निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक करणे अशक्य झाले. या बदलत्या परिस्थितीस रेल्वेला दोषी धरता येणार नाही. त्यामुळे, जेव्हा पदे रिक्त होतील, तेव्हाच या उमेदवारांची नेमणूका करण्याव्यतिरिक्त अन्य कोणताही मार्ग उरलेला नाही. जोपर्यंत सगळया उमेदवारांना सामावून घेतले जात नाही, तोपर्यंत नवीन निवड प्रक्रिया केली जाणार

नाही. त्यांनी सादर केलेल्या तक्त्यावरुन असे आढळते की, ७७५ उमेदवारांपैकी १०६ जणांनी त्यांना देण्यात आलेले पद स्वीकारण्यास नकार दिला. तसेच, दक्षिण रेल्वेतील 'एन.टी.पी.सी.' वर्गवारीतील पदे घेण्यास ६६ जण तयार नसल्याचे गृहीत धरावे लागेल. ते ६६ जण दक्षिण अथवा, मध्य रेल्वेत कुशल कामगार पद घेण्यासही तयार नाहीत. मध्य रेल्वेत 'एन.टी.पी.सी.' वर्गवारीतील पदे स्वीकारण्यास १११ जणांनी तयार दर्शवली. याशिवाय, ३०४ जणांना पश्चिम रेल्वेत सामावून घेण्याचा अंदाज आहे. १७ जणांना दक्षिण रेल्वेत तर, आणखी ५० जणांना दक्षिण-पूर्व रेल्वेत अशा प्रकारे शिल्लक उमेदवारांना सोईनुसार रेल्वेच्या वेगवेगळ्या विभागात सामावून घेण्याचा अंदाज आहे.

वर जे काही सांगण्यात आले आहे त्यावरुन हे स्पष्ट होते की, समस्येची निर्मीती खुद्द रेल्वेनेच केली आहे. त्यामुळे अडचणी आल्या आहेत. परंतु, प्रदिर्घ काळ त्या न सोडवण्यास परवानगी देता येणार नाही. कारण, त्यामुळे निवड आणि त्याचा लाभ दोन्ही निष्फळ होईल. जाहिरात देऊनही ८ वर्षे उलटली. निकाल देखील १९८८ साली जाहीर झाला. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करता न येण्याचा शपथपत्रातील खुलासा समाधानकारक नाही. मार्च १९९५ पर्यंत उमेदवारांच्या नेमणूका करु, ही अधिका-यांनी अंगावर घेतलेली जबाबदारी पार पाडली नाही. याबद्दल दुमत नाही की, १९९७ साली ७७५ उमेदवारांची निवड झाली. नव्या परीक्षा घेण्याचा निर्णय १९८९ चा आहे. लगेचच, उमेदवारांनी न्यायाधिकरणाकडे आणि उच्च न्यायालयात धाव घेतली. रेल्वेला हे चांगले माहित होते की, सदरचा वाद न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, १९८९ किंवा, १९९० ला त्यांनी नवी भरती प्रक्रिया सुरु करायलाच नको होती. १९८९ आणि १९९० ची दोन पॅनले प्राप्त झाली हे खरोखरच विस्मयकारक आहे. १९८७ नंतरच्या रिक्त पदांपुरतीच ती असावयास हवी होती. जाहिरातीत तसेच, उच्च न्यायालयासमोर असे कोठेही

भाष्य नाही की, १९८७ च्या रिक्त पदांकरताच १९८९ आणि १९९० साली परत जाहिरात दिली आहे. त्यामुळे हे समजू शकत नाही की, १९८७ साली अस्तित्वात असलेल्या रिक्त पदांकरता १९८९ आणि १९९० मध्ये पुन्हा जाहिरात कशी दिली जाऊ शकते? हे देखील समजू शकत नाही की, १९८७ साली अस्तित्वात असलेली पदे १९८९, १९९० आणि १९९२ मध्ये कशी नाहीशी झाली? १९९१ सालीच विद्वान एकमेव न्यायमूर्ती यांनी परत दुस-या परीक्षा घेण्याचा आदेश रद्द केला होता. कोणत्याही न्यायालयाकडून स्थगिती आदेश नसताना रेल्वे आपणहून या व्यक्तीच्या नेमणूका न करण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. तसेच, ज्या उमेदवारांची निवड १९८७ ला झाली आहे, त्यांना नेमणूकीपासून वंचित ठेवू शकत नाहीत. पदांची संख्या घटली वगैरे कथन फारश्या गांभीर्याने आणि जबाबदारीने केलेले दिसत नाही. उच्च न्यायालयाने १९९१ साली याचिकेचा निर्णय दिला तेव्हा, तेथे तसे सांगण्यात आले नव्हते. तसेच, विशेष अनुमती याचिकेतही तसे काही नव्हते. मुख्य वैयक्तिक अधिकारी यांच्या शपथपत्रानुसार १९८७ ते १९९३-१९९४ या काळात पदांची संख्या घटली. याचिकांचे निर्णय होण्याआधी ती अडचण नव्हती. जर तसे खरोखरच असते तर, १९८९ आणि १९९० मध्ये निवड प्रक्रिया कशी झाली? अपिलार्थीच्या या खुलाश्यावर देखील आम्ही समाधानी नाही की, ज्यांची निवड झाली त्यांना दक्षिण रेल्वेत येण्याचा प्रस्ताव दिला होता. परंतु, त्यांनी तो नाकारला. अपिलार्थी यांचे सगळे वागणे हे न्याय्यवर्तनाशी विसंगत आहे. याठिकाणी, याचा उल्लेख करणे अनाठायी होणार नाही की, आमच्या हे लक्षात आणून दिले आहे की, विलंब आणि रेल्वेची (बेफिकीर आणि उदासिन) वृत्ती यामुळे अनेक उमेदवारांना इतके वैफल्य आले की त्यांनी आत्महत्या केल्या.

आम्ही त्याप्रमाणे अपिलार्थी रेल्वे यांना असे निर्देश देत आहोत की, त्यांनी आजपासून १२ आठवड्यात शिल्लक राहिलेल्या सर्व उमेदवारांच्या नेमणूका

दक्षिण विभागात त्या झाल्या असल्याचे पत्र जारी करावे. ज्यांनी बाहेर जाण्यास नाकारले त्यांनादेखील पत्र पाठवावे. कारण, आम्हाला अशी माहिती देण्यात आली आहे की, त्यांची आता अन्य विभागात जाण्याची देखील तयारी आहे. मात्र, महिला उमेदवारांची नेमणूक केवळ दक्षिण विभागातच करावी. ज्यांनी, या आधीच अन्य विभागात नोकरी धरली आहे त्यांचा या आदेशामुळे दक्षिण विभागावर हक्क रहाणार नाही. जर, पदे उपलब्ध नसतील तर, रेल्वेने ती वेळेत निर्माण करावीत. मात्र, त्यासाठी वेगळा वेळ दिला जाणार नाही. जर, १२ आठवड्यात सर्व उमेदवारांच्या नेमणूका झाल्या नाहीत तर, ते या आदेशाचा भंग केल्यासारखे होईल आणि त्याकरता जबाबदार व्यक्तीवर योग्य ती कारवाई होईल. हा आदेश करताना आम्हास फारसा आनंद होत नाही. पण, सप्टेंबर, १९९२ साली केलेला आदेश आणि त्यानंतर विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी डिसेंबर १९९३ मध्ये, 'निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मार्च १९९५ पर्यंत नोकरीत सामावून घेऊ' या आशयाचे दिलेले आश्वासन, या दोन्हीमुळे आमच्यावर ही वेळ आणली आहे. यापुढील, कोणत्याही प्रकरणात या नेमणूका हा प्रश्नाचा विषय होऊ नये.

**प्रकरण निकाली काढण्यात आले.**

**अस्वीकरण**

**या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल**

**आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.**